।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारूती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि ३ ऑगस्ट २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३२ वा





## हार्दिक अभिष्टचिंतन !!

आमचे परममित्र अभिजित (गोटू) दौंडे यांना वाढदिवसाच्या व उदंड आयुष्याच्या आभाळभर शुभेच्छा....

शुभेच्छूक

ॲड.रोहित मारूती सोनवणे


# सांगोल्यातील मार्केट कमिटीचा सीएनजी पंप असून खोळांबा आणि नसून अडचण

## अनियमित पुरवठा व वाहनांची घुसखोरी यामुळे वाहनधारकांना मनस्ताप



सांगोला : सांगोला शहरातील पंढरपूर रस्त्या लगत असलेल्या मार्केट कमिटीच्या पंपावर कायमच सीएनजीचा अनियमित होणारा पुरवठा त्यात लाईन मध्ये न येता वशिलेबाजीने घुसखोरी करणारे वाहनधारक यामुळे मार्केट कमिटीचा सीएनजी पंप असून खोळांबा आणि नसून अडचण झालेला आहे.सांगोला शहरात एक वर्षापुर्वी मार्केट कमिटीच्या पेट्रोल पंपावर सीएनजी गॅसची सुविधा सुरू झालेली आहे.सदरील पंपात सीएनजीची गाडी ही नियमित पणे येत नसल्याने व यामध्ये असलेला नियोजनाचा अभाव यामुळे सांगोला शहर व तालुका परिसर तसेच परगावच्या वाहनधारकांना याचा मोठा फ टका बसत आहे.सांगोला शहरात सीएनजी पंप सुरू झाल्यामुळे सीएनजी वाहनांची संख्या मोठया प्रमाणात वाढलेली आहेत.सांगोला शहरातून जाणाऱ्या महामार्गावरून जाणारे वाहनधारकांना देखील सीएनजी मिळत नसल्याने त्यांना देखील याचा मनस्ताप होत आहे.सांगोला शहराच्या ३० किलो मीटर परिसरात दुसरा कोणताच सीएनजी पंप नसल्यामुळे याचा मोठा फ टका वाहनधारकांना होत आहे.सांगोल्यातील पंपावर कधी सीएनजी साखर कारखान्याचा येतो तर कधी सोलापूर येथील कंपनीच्या प्लांट मधुन येतो.सीएनजीचा पुरवठा नियमित व मुबलक प्रमाणावर होण्याकरिता मार्केट कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न गरजेचे झाले असून याकडे लक्ष देवून वाहनधारकांचे समाधान करण्या करिता ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी वाहनधारकांकडून केली जात आहे.

**या सीएनजी पंपावर वशिलेबाजीच्या जीवावर काही वाहनधारक नियमितपणे थेट सीएनजी भरण्याकरिता लाईन मध्ये न थांबता जात असून याबाबत कर्मचाऱ्यांना विचारले असता ते मार्केट कमिटीचे पदाधिकारी यांचे नांव सांगतात तर काही कर्मचारी अरेरावीची भाषा वापरून दादागिरी करीत असलेने याबाबत मार्केट कमिटीचे सभापती समाधान पाटील यांना नागरिकांनी वाहने घुसखोरी करीत असल्याचा व्हिडिओ पाठविला असता त्यांनी मोबाईल फ ोन देखील उचलला नाही,त्यामुळे यासर्व प्रकारास मार्केट कमिटीच्या पदाधिकाऱ्यांची देखील मुकसंमती आहे काय ? असा सवाल यानिमित्ताने वाहनधारकांकडून विचारला जावू लागला आहे.**

# सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गातील बाधित शेतकऱ्यांना न्याय

## माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या पाठपुराव्याला अखेर यश



सांगोला : सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यासह हजारो शेतकऱ्यांना गेली १० ते १२ वर्षे त्यांच्या भूसंपादित जमिनीचे मोबदले न मिळाल्याने प्रचंड आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र, अखेर माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भात ठोस निर्णय घेऊन बाधित शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी सक्षम अधिकारी नसल्याने ही मोबदला मिळण्याची प्रक्रिया पार पाडण्यासाठी मंत्री महोदयांनी अतिशय संवेदनशील असलेला या विषयाचे महत्त्व अत्यंत गांभीर्याने घेऊन उपस्थित सचिवांना तात्काळ सक्षम अधिकाऱ्यांच्या नेमणुका करून वेळेत सुनावण्या घेऊन शेतकऱ्यांना काळ मर्यादा देऊन निर्धारित वेळेत त्यांचा मोबदला देण्यासंबंधी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले आहेत.

मुंबईतील मंत्रालयातील दालनामध्ये नुकत्याच झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला महसूल विभागाचे मुख्य सचिव विकास खर्गे, सहाय्यक सचिव मिलिंद म्हैसकर, ॲड.रितेश कुलकर्णी, त्यांचे सह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. त्याचबरोबर या बैठकीस सोलापूरचे जिल्हाधिकारी व पुणे विभागीय आयुक्त हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते. या निर्णयामुळे सांगोला तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यातील साधारणत: १२ ते १५ हजार लाभार्थी शेतकऱ्यांना याचा प्रत्यक्ष फायदा होणार आहे व बाधित शेतकऱ्यांची वर्षानुवर्षेची प्रतीक्षा संपणार आहे.

या महामार्गामध्ये बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी यांचे भूसंपादन होऊन रस्ते पूर्ण होऊन त्यावरील वाहतूक सुद्धा अनेक वर्ष सुरू झाली मात्र या शेतकऱ्यांना मोबदला मिळण्यासाठी अधिकारी स्तरावरून होणाऱ्या प्रक्रिया सक्षम अधिकारी नसल्यामुळे शेतकऱ्यांची अक्षरशः ससेहोलपट झाली. सदर खटल्यामध्ये मोबदला मिळण्याचा मार्ग मोकळा होण्यासाठी वेळोवेळी तात्काळ सुनावणी होणे गरजेचे होते परंतु पुणे–सोलापूर परत पुणे असा खटला सातत्याने चालत गेल्याने जणू शेतकऱ्यांची पूर्णपणे चेष्टा यामध्ये झाली होती.

पान नं. २ वर......

# ३ ऑगस्ट रोजी जन्माला येणाऱ्या मुलींच्या नावे १५ हजार रुपयांची ठेव ठेवण्याचा माजी नगरसेवक आनंदाभाऊ माने यांचा संकल्प



सांगोला : माजी नगरसेवक आनंदाभाऊ माने यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त अनोखा संकल्प केला आहे. समाजात मुलींचे प्रमाण वाढावे ,मुलगी देखील मुलाप्रमाणे वंशाचा दिवा आहे. मुलीच्या जन्माचे स्वागत व्हावे या उद्देशाने आपल्या ३ ऑगस्ट रोजी साजरा होत असलेल्या वाढदिवसानिमित्त सांगोला तालुक्यात वाढदिवसादिवशी जन्मलेल्या मुलींच्या नावे १५ हजार रुपयाची ठेव ठेवण्याचा संकल्प केला आहे.

गेल्या अनेक वर्षापासून वाढदिवसा दिवशी जन्मलेल्या मुलींच्या नावे ठेव ठेवण्याचा संकल्प आजही पुढे चालू ठेवला आहे. त्यांच्या या कार्याचा आदर्श महत्त्वाचा मानला जात आहे. जन्मलेल्या मुलीच्या जन्मासंदर्भात डॉक्टरांचे सर्टिफिकेट, व आधारकार्ड सोबत आणावे . तसेच वाढदिवसानिमित्त शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण करून निसर्गाचे संवर्धन व निसर्गावरचे प्रेम व्यक्त केले जाणार आहे. गेल्या अनेक वर्षापासून वाढदिवसानिमित्त पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपण करून त्या वृक्षांची जोपासना करण्याची काळजी ते घेत आहेत. वाढदिवसानिमित्त मुलींच्या नावे ठेव ठेवण्याचा केलेला संकल्प व वृक्षारोपण कार्यक्रम हा वाढदिवसाचाआगळावेगळा उपक्रम असल्याचे राजमाता प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष, माजी नगरसेवक तु गटनेते आनंदाभाऊ माने यांनी सांगितले आहे.

# रोटरी क्लब व इनरव्हील क्लब सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्ट रोजी देशभक्तीपर गीतांवर समूहनृत्य स्पर्धेचे आयोजन

## यावर्षीपासून पहिली ते चौथी जिल्हा परिषद शाळांचा व खाजगी शाळांचा करण्यात येणार स्वतंत्र गट

सांगोला : सांगोला शहर व तालुक्यातील प्राथमिक, सर्व खाजगी प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सालाबाद प्रमाणे याही वर्षी सांगोला रोटरी क्लब व सांगोला इनरव्हील क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने देशभक्तीपर गीतांवर समोर नृत्य स्पर्धेचे आयोजन शुक्रवार दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १ वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह सांगोला येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती रोटरी क्लबचे अध्यक्ष श्रीपती आदलिंगे व इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा डॉ.सुजाता पाटील यांनी दिली.

यावर्षीपासून पहिली ते चौथी जिल्हा परिषद शाळांचा व खाजगी शाळांचा स्वतंत्र गट करण्यात येणार आहे.

इयत्ता पहिली ते चौथी गटातील प्रथम क्रमांक विजेत्यास ३५०० रुपये व ट्रॉफी, द्वितीय क्रमांक विजेत्यास ३००० रुपये व ट्रॉफी तर तृतीय क्रमांक विजेत्यास २५०० रुपये व ट्रॉफी देण्यात येणार आहे. इयत्ता पाचवी ते सातवी गटातील प्रथम क्रमांक विजेत्यास ४५०० रुपये व ट्रॉफी, द्वितीय क्रमांक विजेत्यास ४००० रुपये व ट्रॉफी तर तृतीय क्रमांक विजेत्यास ३५०० रुपये व ट्रॉफी देण्यात येणार आहे. इयत्ता आठवी ते दहावी गटातील प्रथम क्रमांक विजेत्यास ५५०० रुपये व ट्रॉफी, द्वितीय क्रमांक विजेत्यास ५००० रुपये व ट्रॉफी तर तृतीय क्रमांक विजेत्यास ४५०० रुपये व ट्रॉफी देण्यात येणार आहे.

स्पर्धेचे नियम व अटी:प्रत्येक गटात प्रथम नाव नोंदविणाऱ्या १५ संघास प्रवेश दिला जाईल. २) प्रत्येक गटात, प्रत्येक शाळेला एकच संघ पाठविता येईल.३) समूह नृत्यामध्ये विद्यार्थी संख्या ७ ते १५ असावी. ४) समूह नृत्य हे देशभक्ति गितावर आधारीत असावे. रिमिक्स असू नये. मूळगीताच्या चालीवर असावे. ५) अनेक गीताचे मुखडे एकत्र करून तयार केलेले गीत मूळ चालीचे (ािळसळपरश्र) चालेल. ६) गीत ५ ते ७ मिनीटाचे असावे. ७) झशपवीर्ळींश मध्ये एकच गीत असावे. ८) प्रत्यक्ष वाद्यवृंद आणू नये. ९) मूळ संगीतात बदल व अश्लिल गीत स्वीकारली जाणार नाही. १०) परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील. ११) स्पर्धेसंबंधी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार स्वीकारली जाणार नाही . १२) स्पर्धा सुरु असताना अथवा संपल्यानंतर कोणत्याही संघाने अथवा शाळेने गोंधळ अथवा हुल्लडबाजी केलेचे निर्दशनास आल्यास संबंधित संघास अथवा शाळेस पुढील तीन वर्षासाठी सहभागी करून घेतले जाणार नाही. १३) नोंदणी दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी सायं. ५ वाजेपर्यंत राहील.

स्पर्धेच्या अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी रो. डॉ.साजिकराव पाटील मो.८८८८८८३६६३, रो. इंजि.अशोक गोडसे मो. ९४२३३२७३४६, रो इंजि.विकास देशपांडे मो.९४२२६४४६४४, रो.विजय म्हेत्रे मो.९८२२१४२४४६, रॉ.निसार इनामदार मो.९६८९५५५०५६, रो.धनाजी शिर्के मो.९९६०१२५००२, डॉ.सुजाता पाटील मो.७५८८२१६३३१, सौ.संगीता चौगुले मो.९४२३३२७५०२ यांच्याशी संपर्क साधावा.

देशभक्तीपर गीतांवर समुह नृत्य स्पर्धेमध्ये सांगोला तालुक्यातील जास्तीत जास्त प्राथमिक व माध्यमिक शाळांनी सहभागी व्हावे असे आवाहन रोटरी क्लबचे सचिव रो. विजय म्हेत्रे व इनरव्हील क्लबच्या सचिव सौ. संगीता चौगुले यांनी केले आहे.

# केदारवाडी-वासुद या गावासाठी आरोग्य उपकेंद्र मंजूर करावे

## आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांची आरोग्यमंत्री यांचेकडे आग्रही मागणी



सांगोला : मौजे वासुद –केदारवाडी हे गांव सद्यस्थितीला आरोग्य सुविधेकरीता आरोग्य उपकेंद्र,कमलापूर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र,अकोला अंतर्गत जोडलेली असून वासुद गावच्या नागरिकांना आरोग्य सुविधा,आरोग्य विभागातील शासकीय योजनांचा लाभ घेऊन अंमलबजावणी करण्यासाठी जाणेकरिता आरोग्य उपकेंद्र , कमलापूर येथे जावे लागते.उपकेंद्र कमलापूर येथे जाणेकरिता वासुद ते सांगोला व नंतर सांगोला ते कमलापूर असे जाऊन आरोग्य सुविधा घ्याव्या लागत आहेत.

तसेच मौजे केदारवाडी – वासुद ते कमलापूर आरोग्य उपकेंद्र जाणारा हा रस्ता अतिशय खराब अवस्थेत असून नागरिकांना ये–जा करण्यास खूपच अडचणी निर्माण होत आहेत.मौजे वासुदकेदारवाडी या गावची संपूर्ण लोकसंख्या जवळपास ५००० इतकी असून ही नदीकाठची गावे असल्यामुळे जोखिमग्रस्त आहेत.

तरी वरील बाबींचा सकारात्मक विचार करून तात्काळ मौजे केदारवाडी–वासुद या ठिकाणी आरोग्य उपकेंद्र मंजूर होऊन लवकरात लवकर कार्यान्वित व्हावे अश्या प्रकारचे निवेदन सांगोल्याचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी सोलापूर यांचे अंतर्गत आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सादर केले आहे.

# मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाचे नोटिफिकेशन जारी

## सहा जिल्ह्यांच्या ४५ वर्षांच्या लढ्याला यश

सांगोला: मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाचे नोटिफिकेशन जारी करण्यात आलं असून येत्या १८ ऑगस्टपासून खंडपीठाचं काम सुरू होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्तींकडून १ ऑगस्ट रोजी याचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

यामुळे सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांच्या ४५ वर्षांच्या लढ्याला यश मिळालं आहे. कोल्हापूरमध्ये उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे मागच्या अनेक वर्षांपासून मागणी होती. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांना त्याचा फायदा होणार होता. परंतु याचा निर्णय होत नव्हता. त्यासाठी या सहा जिल्ह्यातील वकील मंडळींकडून अनेक आंदोलने करण्यात आली. आता या लढ्याला मोठं यश मिळालं आहे.

. न्यायालयीन प्रक्रियेमध्ये होणारा विलंब टाळण्यासाठी कोल्हापुरातील खंडपीठ महत्त्वाचं आहे. त्यामुळे सहा जिल्ह्यांतील नागरिकांना त्याचा फायदा होणार आहे. वेळेसोबत पैशाचीही बचत त्यामुळे होणार आहे व लवकर न्याय मिळण्यास मदत होणार असल्यामुळे सर्व स्तरातून स्वागत व आनंद व्यक्त केला जात आहे.

# सांगोला तालुका विधि सेवा समिती व विधिज्ञ सेवा संघ, सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने चौगुले सायन्स क्लासेस येथे कायदेविषयक शिबीर संपन्न



सांगोला : महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई, मा. जिल्हा विधि सेवा प्राधिकरण,सोलापूर यांचे आदेशान्वये सांगोला तालुका विधि सेवा समिती व विधिज्ञ सेवा संघ, सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दिनांक ३०/०७/ २०२५ रोजी दुपारी २:२० वाजता चौगुले सायन्स क्लासेस, सांगोला येथे कायदेविषयक शिबीराचे आयोजन करणेत आले होते. आजच्या विद्यार्थ्यांमध्ये कायदे विषयक ज्ञानाची ओढ कमी होत चालली आहे. म्हणूनच भारताची भावी पिढी असणारे विद्यार्थी यांना कायदयाचे ज्ञान प्राप्त व्हावे या करीता हे शिबिर भरवले होते. या शिबीरामध्ये राईट टू एज्युकेशन, बेटी बचाओ , पॉक्सो ॲक्ट २०१२ हे विषय निवडण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सांगोला न्यायालयाचे दिवाणी न्यायधीश श्रीमती. पी.आर. कुलकर्णी मॅडम यांनी भूषविले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून सांगोला विधीज्ञ संघाचे अध्यक्ष श्री एम.एन.ढाळे व सक्सेस क्लासेसचे संचालक श्री संजय चौगुले सर उपस्थीत होते. या कार्यक्रमाचे प्रास्तावीक सांगोला विधीज्ञ संघाच्या सदस्या ॲड श्रीमती सी.व्ही.बनकर यांनी केले. तर या संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सांगोला विधीज्ञ संघाचे सदस्या ॲड श्रीमती.एच.डी.मेनकुदळे यांनी केले.

या शिबीरामधील राईट टू एज्युकेशन या विषयावर बोलताना ॲड श्री. जी.एम.खटकाळे यांनी शिक्षणाचा हक्क व अधिकार यांची माहीती दिली. तसेच या कायद्यामध्ये झालेल्या बदलांची सविस्तर माहीती करुन दिली. तसेच त्यांनी विदयार्थ्यांना आपल्या आयुष्यामध्ये शिक्षणाचे महत्व पटवून दिले.

या शिबीरामधील दुसरा विषय बेटी बचाओ बेटी पढाओ हा होता. या विषयाचे महत्व सांगताना ॲड श्रीमती एन. एम.जवंजाळ यांनी अतिशय सुंदर दाखले देवून सर्वांना बेटी बचाओ बेटी पढाओ याविषयाचे महत्व समजावून सांगितले. शिबीरामधील तिसरा व महत्वाचा विषय होता पॉक्सो ॲक्ट या विषयावर सांगोला विधीज्ञ संघाच्या सदस्या श्रीमती एस.एस.कोठावळे यांनी खुप सुंदर मार्गदर्शन केले. या कायदयाची निर्मीती, आवश्यकता व महत्व अतिशय उत्तमप्रकारे समजावून सांगितले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात दिवाणी न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश श्रीमती पी.आर.कुलकर्णी मॅडम यांनी मुलांना शिबीरातील प्रत्येक विषयावर अतिशय उत्तम मार्गदर्शन कैले. प्रत्येकाने शिक्षण घेणे ही काळाची गरज आहे हा अतिशय मोलाचा संदेश आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिला.

या कार्यक्रमास विधीज्ञ संघाचे सदस्य ॲड.श्री. जी.एल.भाकरे, सांगोला विधीज्ञ संघाच्या महीला प्रतिनीधी ॲड एस.व्ही.बोत्रे, ॲड श्रीमती. एस.टी.खांडेकर, ॲड श्रीमती. एस.व्ही.धनवडे, ॲड श्रीमती. आर. आर. केदार, ॲड श्रीमती ए. बी.मोहीते, ॲड श्रीमती. आर.एन.दौंड या उपस्थीत होत्या. तसेच या कार्यक्रमास चौगुले सायन्स क्लासेसचे विदयार्थी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

आभार प्रदर्शन सांगोला विधीज्ञ संघाच्या सदस्या श्रीमती पी. डी राजमाने यांनी केले. हा कार्यक्रम आयोजीत करणेकामी सांगोला विधीज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड श्री.एम,एन.ढाळे, सांगोला न्यायालयातील कर्मचारी श्री. वाय.जी.तारे, श्री.पी.बी.शिंदे, श्री.संतोष शिंदे यांनी परिश्रम घेतले.

**पान नं. १ वरुन....सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गातील बाधित शेतकऱ्यांना न्याय**

सोलापूर जिल्ह्यातील १० ते १२ वर्षापासून १५ ते १६ हजार खटले आजपर्यंत प्रलंबित आहेत त्यामुळे मंत्रीमहोदयांनी माजी आमदार दिपकआबा यांच्या विनंतीवरून हे आदेश दिल्याने अनेक वर्षापासून भूसंपादन होऊनही वर्षानुवर्षे मोबदला न मिळाल्याने शेतकरी वेठीस धरले गेले होते. हा केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक अन्याय होता. माझी ही आग्रही मागणी महसूल मंत्री नाम. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मकपणे मान्य केली आणि तातडीने निर्णय घेऊन ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी स्वतंत्र लवाद नेमून तात्काळ वेळेत सुनावण्या घेऊन सक्षम अधिकाऱ्याची नेमणूक करून निर्धारित काळ मर्यादेमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यावर लवकरात लवकर थेट मोबदला जमा करण्याच्या सूचना दिल्या. हा निर्णय म्हणजे शेतकऱ्यांच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याचे यश आहे. माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील शेतकऱ्यांचा मोबदला मिळण्यासाठी केलेल्या प्रतीक्षेला कायमस्वरूपी पूर्णविराम मिळून अडकलेले मोबदले मिळण्याचा मार्ग आता सुकर झाल्याने अन्याय सहन करणाऱ्या शेतकऱ्यांना अखेर दिलासा मिळणार आहे. या निर्णयामुळे माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांचे बाधित शेतकरी वर्गातून कौतुक होत आहे.

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com

संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४२ वे अंक-३६ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# श्रावणात घन निळा बरसला....! श्रावणांत सणांची रेलचेल




श्रावण महिना हा हिंदू पंचांगानुसार आणि भारतीय सौर दिनदर्शिकेनुसार वर्षातला पाचवा महिना आहे. या महिन्याच्या पौर्णिमेला चंद्र श्रवण नक्षत्रात असतो, त्यावरून या महिन्याला 'श्रावण' असे नाव मिळाले आहे. भारतीय राष्ट्रीय दिनदर्शिकेतला श्रावण महिना हा जुलैच्या उत्तरार्धात पौर्णिमेपासून सुरू होतो आणि ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात पुढील पौर्णिमेच्या दिवशी संपतो. तमिळ कॅलेंडरमध्ये तो 'अवनी' म्हणून ओळखला जातो आणि तो सौर वर्षाचा पाचवा महिना असतो. चंद्र धार्मिक कॅलेंडरमध्ये श्रावण हा अमावस्येपासून सुरू होतो आणि तो वर्षाचा पाचवा महिना असतो. श्राबोन हा सौर बंगाली कॅलेंडरचा चौथा महिना आहे, तसेच नेपाळी कॅलेंडरचा चौथा महिना असतो. श्रावण हा वर्षा ऋतुचा (पावसाळ्याचा) दुसरा महिना असतो.

साधारणतः ८ किंवा ११ आणि क्वचित १९ वर्षांनी अधिक श्रावेतो. त्या महिन्यात येणाऱ्या शुक्ल किंवा वद्य या दोन्ही एकादश्यांना कमला एकादशी हे नाव आहे. उत्तर हिंदुस्थानात या एकादश्यांना अनुक्रमे पद्मिनी आणि परम एकादशी म्हणतात. एकादश्या वगळल्या तर अधिक श्रावणात कोणतेही हिंदू सण किंवा व्रताचे दिवस येत नाहीत. ज्यावर्षी अधिक श्रावण असतो त्यावर्षी पाच महिन्यांचा चातुर्मास असतो. चातुर्मासात लग्ने होत नसल्याने ती अधिक श्रावणातही होत नाहीत. श्रावण महिन्याला सर्व सणांचा राजा म्हटले जाते. श्रावण महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्या ना कोणत्या देवतेची पूजा वा व्रत करण्याची हिंदू आणि जैनधर्मीयांची परंपरा आहे. या विशिष्ट महिन्यात केल्या जाणाऱ्या शंकराच्या उपासनेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. संपूर्ण भारतीय उपखंडासाठी श्रावण महिना खूप महत्त्वाचा आहे कारण तो नैऋत्य मान्सूनच्या आगमनाशी जोडलेला आहे. श्रावण शुद्ध पंचमीच्या दिवशी नागांची पूजा करण्याची परंपरा भारतीय संस्कृतीत प्रचलित आहे.

तसेच रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा हा सण हिंदू महिन्यांपैकी श्रावण महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो. या दिवशी समुद्रकिनारी राहणारे लोक वरुणदेवते प्रित्यर्थ समुद्राची पूजा करून त्याला नारळ अर्पण करतात. या दिवशी मासेमारी करणारे महाराष्ट्रातले कोळी व समुद्राशी निगडित असलेल्या व्यवसायांतील इतर लोक समुद्राची पूजा करून त्यास नारळ अर्पण करतात. पावसाळ्यात बंद असलेले मासे पकडणे या दिवसापासून परत सुरू होते. ज्या कुटुंबात रोजच्या खाण्यात नारळ नसतो, त्याही मराठी घरांमधून या दिवशी नारळीभात, नारळाच्या वड्या यांसारखे नारळापासून बनलेले खाद्य पदार्थ बनवतात. याच दिवशी बहीण भावाच्या हातात राखी बांधते त्यावरून या पौर्णिमेला राखी पौर्णिमा असे म्हणतात. ही पौर्णिमा पोवती पौर्णिमा म्हणूनही ओळखली जाते, कारण या दिवशी सुताची पोवती करून ती विष्णू, शिव, सूर्य इत्यादी देवतांना अर्पण करतात व मग कुटुंबातील स्त्री-पुरुष ती पोवती हातात बांधतात.


या दिवशी श्रवण नक्षत्र असल्याने ब्राह्मण पुरुष उपाकर्म करून नवीन यज्ञोपवीत धारण करतात. या विधीला श्रावणी असे नाव आहे. श्रावणी ही श्रावण पौर्णिमेलाच करतात असे नाही, श्रावणी हस्त नक्षत्रात चंद्र असताना 'श्रावण शुक्ल पंचमी'लाही असू शकते. पौर्णिमेला चंद्रग्रहण असल्यास श्रावण पौर्णिमेला श्रावणी नक्कीच करत नाहीत. ऋग्वेद्यांची श्रावणी, यजुर्वेद्यांची श्रावणी, तैत्तिरीय शाखा व तिच्या अंतर्गत येणाऱ्या हिरण्यकेशी उपशाखेच्या ब्राह्मणांची श्रावणी या वेगवेगळ्या दिवशी असू शकतात. श्रावण महिन्यात लागोपाठच्या दोन दिवशी पौर्णिमा असेल, तर पहिल्या दिवशी नारळी पौर्णिमा आणि दुसऱ्या दिवशी राखी पौर्णिमा असते. राखी पौर्णिमेच्या दिवशी भारताच्या उत्तराखंड राज्याच्या चंपावत जिल्ह्यातल्या देईपुरी इलाख्यात बरही देवीला खुश करण्यासाठी गावातल्या दोन गटांत एकमेकांवर दगडफेक होते. दगडफेकीत अनेकजण घायाळ होतात. २०१९ साली १२० लोक जखमी झाले होते. मात्र हायकोर्टाने दगडफेकीवर बंदी आणल्याने काही लोकांनी दगडांऐवजी सफरचंदे फेकून मारली.

उत्तर भारतात या महिन्यात झुलन यात्रा, रक्षाबंधन, जन्माष्टमी व नंदोत्सव हे उत्सव विशेष महत्त्वाचे मानतात. झुलन जत्रा हा दोलोत्सव आहे. पौर्णिमेच्या दिवशी राधा व कृष्ण यांना हिंदोळ्यावर बसवून झोके देतात व स्त्रिया त्यांच्यासंबंधी गीते गातात. हा उत्सव एकादशी पासून पौर्णिमेपर्यंत चालतो. कृष्ण जन्माच्या दुसऱ्या दिवशी नंदोत्सव करतात. नंदाला पुत्र झाला असे समजून या दिवशी हळदी-कुंकू मिसळलेले पाणी पिचकारींने उडवतात.

-प्रविण बागडे,नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

*****

# स्वर्गीय आ.भाई गणपतराव देशमुख यांच्या पुण्यस्मरण व जयंती दिनानिमित्त मोफत महाआरोग्य तपासणी व महा रक्तदान शिबिराचे ८ ऑगस्ट रोजी भव्य आयोजन



सांगोला : सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते स्वर्गीय आम.भाई गणपतरावजी देशमुख यांच्या ३० जुलै पुण्यतिथी व १० ऑगस्ट रोजी जयंती दिनानिमित्त मोफत महाआरोग्य तपासणी व महारक्तदान शिबिर शुक्रवार दि.८ ऑगस्ट रोजी सांगोला तालुका व पंचक्रोशीतील गोर गरीब गरजू रुग्णांसाठी आयोजित करण्याचे योजिले आहे.

सदरच्या शिबिरामध्ये रुग्ण सेवा हीच ईश्वरसेवामानून सोलापूर व सांगली जिल्ह्यातील सर्व नामवंत हॉस्पिटलचे सुप्रसिद्ध तज्ञ डॉक्टर्स उपस्थित राहणार असून त्या अनुषंगाने गरजू रुग्णांची मोफत रक्त तपासणी मोफत औषधे वितरण होणार आहे. तसेच रक्तदान हेच सर्वश्रेष्ठदान, जीवनदान.. या संकल्पनेखाली महारक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना यासंबंधी तसेच सर्व शासकीय योजनांची माहिती सांगोला पंचक्रोशीतील लोकांना देण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने प्रत्येक व्यक्तींचे मोफत वैद्यकीय सुविधा व शस्त्रक्रिया यांचा लाभ घेण्यासाठी आयुष्यमान कार्ड, गोल्डन कार्ड हे काढून देण्यात येणार आहे. या शिबिरामध्ये मोफत कर्करोग तपासणी,बोन डेंसिटी टेस्ट ,डोळ्यांची तपासणी– मोफत चष्मे वाटप, मोफत कार्डिओग्राम – हृदयाची तपासणी तसेच ६० वर्षावरील सर्व लोकांची मोफत अँजिओग्राफी आणि गरज भासल्यास मोफत अँजिओप्लास्टी करणे या विषेश आरोग्य सुविधा देण्यात येणार आहेत.

सदरच्या मोफत महाआरोग्य तपासणी शिबिरासाठी कॅन्सर , हृदयरोग, मेडिसिन, अस्थिरोग ,स्त्रीरोग,बालरोग,सर्जरी व मूत्ररोग, त्वचारोग, नेत्ररोग ,मणका व मेंदूरोग ,पोटाचे विकार इत्यादी विविध विभागाचे तज्ञ डॉक्टर्स तसेच हृदयरोग तज्ञ आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.निकीताताई देशमुख सर्व गोरगरीब गरजू रुग्णांना आरोग्य सेवा देण्यासाठी उपस्थित राहणार असून सर्व ग्रामस्थ व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख मेडिकल फॅकल्टी यांनी केले आहे.

सदरचे शिबिर हे सर्व रुग्णांच्या सोयीसाठी सांगोला एसटी स्टँड पासून जवळच जुने जे.एच. कलेक्शन( गुगळे कलेक्शन)चा हॉल, अजिंक्य प्लाझा,वासुद चौक, सांगोला येथे शुक्रवार दिनांक ८ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजल्यापासून सायंकाळी ४ वाजेपर्यंत आयोजित केले आहे. तरी सांगोला ,आटपाडी, मंगळवेढा, जत,पंढरपूर इ. तालुक्यातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा.

# सांगोल्यातील माडग्याळ मेंढ्यासह देशी मेंढयांच्या भव्य बाजारात माणदेशी माडग्याळ मेंढ्याला मोठी मागणी



सांगोला : हालग्याच्या तालावर गुलाल, भंडाऱ्यांची उधळण करीत फटाके वाजवून श्री संत बाळु मामाच्या नावानं चांगभलं.. बिरोबाच्या नावानं चांगभलं.. ची गर्जना करीत सांगोला येथील धनगर समाज बांधवांनी नागपंचमी सणाचे औचित्य साधून भरविलेल्या माडग्याळ मेंढ्यांच्या बाजाराला महाराष्ट्रासह कर्नाटकातील मेंढपाळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दरम्यान बाजारात चोचदार माणदेशी माडग्याळ मेंढ्याला २० हजार रुपये पासून ते सुमारे ५ लाखापर्यंत मागणी आल्याने बाजारात दरवर्षी प्रमाणे माडग्याळ मेंढ्याचा बोलबाला दिसून आला. सांगोला येथील धनगर समाज बांधवांच्या पुढाकारातून मंगळवारी नागपंचमी निमित्त सांगोला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात माडग्याळ मेंढ्यासह देशी मेंढाचा भव्य बाजार भरविला होता.

या बाजारासाठी सोलापूर जिल्ह्यासह शेजारील कर्नाटक राज्यातील विजापूर, उमदी, माडग्याळ ,चडचण, अथनी त स` च ज त कवठेमहांकाळ,नागज, आटपाडी ,सांगली व सातारा जिल्ह्यातील म्हसवड,माण, खटाव, राजेवाडी आदी भागातील धनगर समाज बांधवांनी गुलाल व भंडाऱ्याची उधळण करीत वाजत– गाजत मिरवणुक काढून माडग्याळ मेंढ्यां, बकरी खरेदी–विक्रीसाठी आणल्या होत्या .

यावेळी कोणी मेंढपाळाने मेंढ्यांच्या अंगावर गुलाल, भंडारा टाकलेला तर कोणी मेंढपाळाने मेंढ्याला झुल पांगरलेली, फुलांनी सजवलेल्या मेंढ्यांनी मेंढपाळांचे लक्ष वेधून घेतले.

# आबासाहेब निष्कलंक जीवन जगले त्यामुळे आबासाहेबांचे नाव आजही संपूर्ण राज्यभरात : ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज पठारे

सांगोला : आबासाहेब यांचा ज्यांनी ज्यांनी हात धरला त्यांचे कल्याण झाले असून राजकारणात राहून आबासाहेब परमार्थाचे जीवन जगले आहेत. निष्कलंक जीवन, चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व म्हणजे आबासाहेब. आबासाहेब निष्कलंक जीवन जगले त्यामुळे आबासाहेबांचे नाव आजही संपूर्ण राज्यभरात मोठ्या स्वाभीमानाने व आदराने घेतले जात असल्याचे उद्‍गार कर्जत जामखेड येथील किर्तनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज पठारे यांनी व्यक्त केले.

स्वर्गीय भाई आमदार गणपतराव देशमुख यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण दिनानिमित्त सांगोला सुतगिरणी येथील समाधीस्थळावर भजन कीर्तन पुष्वृष्टी कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी कर्जत जामखेड येथील किर्तनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज पठारे बोलत होते.

पुढे बोलताना ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज पठारे म्हणाले, सर्वांना आदर्श असणारे व्यक्तीमत्व म्हणजे आबासाहेब. आबासाहेबांनी सर्वांना सोबत घेऊन तालुक्यात क्रांती घडविली.आबासाहेबांमुळे तालुक्यात आजही शांतता अबाधित आहे. आबासाहेबांचे व्यक्तीमत्व अष्टपैलू होते.आबासाहेब यांनी तालुक्यालाच आपले कुटुंब समजले होते.त्यामुळे आजही संपूर्ण तालुका आबासाहेबांना आपले आदर्श मानत असल्याचे त्यांनी सांगत आबासाहेबांनी दिलेले विचार सर्वांनी पुढे घेऊन जावेत असे सांगितले. यावेळी आबासाहेबांच्या पत्नी रतनबाई गणपतराव देशमुख, कन्या शोभाताई पाटील, श्री.चंद्रकांतदादा देशमुख, नातू आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ.अनिकेत देशमुख, सौ.सरोजनी पोपट देशमुख, सौ.सुरेखा चंद्रकांत देशमुख, डॉ.निकीताताई बाबासाहेब देशमुख, डॉ.आस्था अनिकेत देशमुख, सुप्रिया देशमुख यांच्यासह देशमुख कुटुंबिय उपस्थित होते. यावेळी ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे, आमदार



रणजितसिंह मोहिते-पाटील, मा.आमदार प्रशांत परिचारक, मा.आमदार रामहरी रुपनवर, अजिंक्यराणा राजन पाटील, जीवन उत्तमराव जानकर, ब्रह्मानंद पडळकर, प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सौ.राणीताई माने, चेतनसिंह केदार-सावंत, श्रीकांतदादा देशमुख, सागर पाटील, यशराजे दिपक आबा साळुंखे पाटील, भरत शेळके, चेतन नरोटे, प्रांताधिकारी भैरवनाथ माळी, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, तहसीलदार संतोष कणसे, मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी, तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव, डॉ. प्रभाकर माळी, मारुतीआबा बनकर, बाळासाहेब एरंडे, माजी चिटणीस विठ्ठलराव शिंदे, चिटणीस दादाशेठ बाबर, ॲड.सचिन देशमुख, इंजि.रमेश जाधव, अरुण पाटील, समाधान पाटील, बाळासाहेब काटकर, अमोल खरात, मायाप्पा यमगर, प्रमोद साळुंखे-पाटील, माऊली हळणवर, सोमनाथ आवताडे, नागेश फाटे यांच्यासह सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह सांगोला तालुक्यासह राज्य, जिल्ह्यातील नागरिक, डॉक्टर्स, इंजिनिअर्स, विधीज्ञ बांधव, शिक्षक, अधिकारी शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते, महिला भगिनी, तालुक्यातील सर्व विविध संस्थाचे सर्व पदाधिकारी, सदस्य, यांनी स्वर्गीय गणपतराव देशमुख यांना अभिवादन केले.

# श्री विठ्ठल मल्टीस्टेटचे चेअरमन दीपक बंद्रे महाराष्ट्र बिझनेस अवॉर्डने सन्मानित

सांगोला : सांगोला येथील श्री विठ्ठल मल्टीस्टेटचे चेअरमन दिपक बंदरे यांना महाराष्ट्र बिझनेस अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. रिसेल इन यांच्या सौजन्याने दिला जाणारा हा पुरस्कार शुक्रवार दि.१ ऑगस्ट रोजी नाशिक येथे संपन्न झाला.

अभिनेत्री प्राजक्ता माळी, डेप्युटी कमिशनर जी.एस.टी. समाधान महाजन, सकाळ मीडिया ग्रुप नाशिकचे विक्रांत मते, हेमंत राठी चेअरमन राम बंधू मसाले यांच्या उपस्थित हा पुरस्कार



प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यात २५ शाखेद्वारे श्री विठ्ठल मल्टीस्टेट ही संस्था उत्कृष्ट आर्थिक सेवा बजावत आहे. या सेवेचा गौरव म्हणून चेअरमन दिपक बंदरे याना या अवार्डने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे अधिकारी, कर्मचारी, सभासद तसेच इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आपुलकी प्रतिष्ठान कडून मेडशिंगी येथे सायकल वाटप व वृक्षारोपण



सांगोला : आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने मेडशिंगी ता. सांगोला येथील दे.भ. कै. संभाजीराव शेंडे विद्यालयात ४ ते ६ कि.मी. अंतर चालत येणाऱ्या ६ विद्यार्थ्यांना सायकल भेट देण्यात आल्या.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव म्हणाले की, आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने यावर्षी मोठ्या प्रमाणात गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य तसेच जुन्या परंतु सुस्थितीत असलेल्या सायकल जमा करून त्या दुरुस्त करून वाटप करण्यात येत आहेत. कुटुंबातील अडीअडचणीमुळे शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी आपुलकीच्या माध्यमातून प्रयत्न चालू असल्याचे सांगितले. यावेळी संस्थाध्यक्ष अरुणभाऊ शेंडे यांनी सांगोला तालुक्यात आपुलकी प्रतिष्ठानचे चालू असलेले काम कौतुकास्पद असल्याचे सांगून शाळेतील विद्यार्थ्यांना सायकल तसेच शैक्षणिक साहित्य दिल्याबद्दल आपुलकीचे आभार मानले.

यावेळी शाळेच्या प्रांगणात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला प्राचार्या पारेकर मॅडम, एलकेपी मल्टीस्टेटचे चेअरमन अनिल इंगवले, डॉ.बंडोपंत लवटे, डॉ.मच्छिन्द्र सोनलकर, चंद्रशेखर कवडे, अमर कुलकर्णी, सुनील मारडे, उपसरपंच सोनलकर ताई यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संजय मुंढे यांनी केले.


हार्दिक अभिष्टचिंतन!!

आमचे नेते



आनंदाभाऊ माने

राजमाता प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष,
सांगोला नगरपरिषदेचे माजी नगरसेवक, गटनेते
मा. आनंदा माने
यांना वाढदिवसानिमित्त
कोटी-कोटी शुभेच्छा...!!!



सुर्यकांत मेटकरी



काशिलिंग गावडे

शुभेच्छुक
काशिलिंग गावडे अध्यक्ष-मायाक्का प्रतिष्ठान,सांगोला.